# Sakal

सकाळ

# गोळप, कोळंबे येथील अंगणवाड्यांचे नूतनीकरण

## ‘फिनोलेक्स, मुकुल माधव फाउंडेशन’चा पुढाकार

■ **सकाळ वृत्तसेवा**

पावस, ता. १० : फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकारातून तालुक्यातील गोळप आणि कोळंबे परिसरातील चार अंगणवाड्यांचे नूतनीकरण करण्यात आले. या अंगणवाड्यांचे लोकार्पण करण्यात आले. यामध्ये गोळप मोहल्ला (उर्दू माध्यम) अंगणवाडी, कोळंबेमधील वाकीवाडी, मांडवकरवाडी आणि गोरिवलेवाडी या अंगणवाड्यांचा समावेश आहे.



**कोळंबे** : फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकारातून नूतनीकृत चार अंगणवाड्यांचे लोकार्पण करण्यात आले. त्या प्रसंगी कंपनीचे अधिकारी, मान्यवर.

या कार्यक्रमास आकाशवाणी रत्नागिरी-सिंधुदुर्गचे डॉ. सुनील गायकवाड, कार्यक्रमाधिकारी विवेक वानखडे, सुहास नंदुरे, बालविकास प्रकल्प अधिकारी केदार चव्हाण व संदीप पाटील, ॲड. गौरव महाजनी व ॲड. रूची महाजनी, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे संचालक रामबाबू संका, सागर चिवटे, नंदकुमार शिंपी, अमित घोरपडे व आशिष आठवले, मुकुल माधव फाउंडेशनचे शुभम भेगडे, शामराव निंबाळकर आणि वरद गोरे आदी उपस्थित होते. फिनोलेक्स कंपनीला ४५ वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने फिनोलेक्स कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे अंगणवाडी नूतनीकरणाचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

> हा उपक्रम मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन प्रकाश प्रल्हाद छाब्रिया यांच्या दूरदृष्टीतून आणि मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत आहे.
>
> **- रामबाबू सांका**, फिनोलेक्स संचालक (तांत्रिक)

यासह गोळप, दाभिळवाडी आणि कोळंबे बागवाडी येथील आणखी दोन अंगणवाड्यांचे नूतनीकरणाचे काम तिसऱ्या टप्प्यात सुरू आहे.